



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २८९, रविवार ४ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


## रुग्णांना जीवदान दिले, त्याचीही चौकशी लावली !

### खा. नीलेश लंके यांचे विरोधकांवर शरसंधान

वाळवणे : प्रतिनिधी

**आम्ही जीवावर उदार होऊन कोरोना काळात काम केले. त्या कोरोना सेंटरचीही काही लोकांनी चौकशी लावली. साधू संतांना, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांना लोकांनी त्रास दिल्याची आठवण करून देत खा. नीलेश लंके यांनी त्यांच्या विरोधकांवर शरसंधान केले.**

वाळवणे येथील खा. लंके यांचे सहकारी सचिन पठारे यांचे वडील गुलाबराव पठारे यांच्या स्मृतीदिनाच्या कार्यक्रमात खा. लंके यांनी जोरदार बॅटींग केल्याने उपस्थितांमध्ये हास्याचे फवारे उडाले.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, आम्ही कोरोना काळात काम केले. लोक विचारतात कसे काम केले ? केवळ तालुक्याचा आमदार म्हणून मी काम केले असते तर ३३ हजार रूग्णांना जीवदान मिळाले नसते. माझी एकच भूमिका होती की आलेला प्रत्येक माणूस जीवाभावाचा आहे. हाडामासाचा आहे. त्याला जगविले पाहिजे ही माझी भूमिका होती म्हणून मी तिथे जीव ओतून काम करू शकलो. जीवाची पर्वा केली नाही. स्वतः चं पोरगं पाण्यात पडल्यावर पोहता येत नसतानाही बाप पाण्यात उडी टाकतो. त्याला वाचविण्याचा प्रयत्न करतो. ही भूमिका आमची कोव्हीड काळात होती असे सांगत कोरोना काळात केलेल्या कामास खा. लंके यांनी उजाळा दिला.

झालो. आता तर त्यांनी वेगळीच म्हणजे मंत्रीपदाची भविष्यवाणी केली आहे. महाराजांनी अशी भविष्यवाणी केली तर लोक किर्तन सोडून तुमच्याकडे हात दाखविण्यासाठी येतील अशी मिश्किल टीपन्नी खा. लंके यांनी केली.



■ स्व. गुलाबराव पठारे यांच्या स्मृतीदिनाच्या कार्यक्रमात अक्रुर महाराज साखरे यांचा खा. नीलेश लंके यांनी सत्कार केला.

#### भावींची संख्या वाढली !

इथे पन्नास-साठ टक्के पुढारी आहेत. आमच्या तालुक्यात भावी फार झाले आहेत. इतर तालुक्यातही भावींची संख्या वाढली आहे. त्यामुळे भविष्यवाणीसाठी महाराजांचा नंबर मला हायलाईट करावा लागणार असल्याचे सांगत विधानसभेसाठी इच्छुक असणाऱ्यांचीही लंके यांनी फिरकी घेतली.

#### चांगले कर्म फळाला आले

चांगले कर्म करा, तुम्हाला आयुष्यात काही कमी पडणार नाही. हीच आपल्या पुर्वजांची शिकवण आहे. वडीलांच्या पुण्यावर सचिन याने वैभव उभे केले आहे. एकेकाळी आम्ही पेट्रोलला महाग असणारी माणसं. आमच्या आई वडीलांनी चांगल कर्म केले. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन आम्हीही चांगले कर्म केले. म्हणून आज कुठेतरी हे फळाला आले असल्याचे लंके म्हणाले.

#### तर कोणीही तुमचे नुकसान करू शकणार नाही

प्रत्येकाच्या हातामध्ये एक तराजू असतो. पापाचा आणि पुण्याचा. तुमचा पापाचं पारडं भरलं तर दुनियातील कोणतीही शक्ती तुम्हाला वाचवू शकत नाही. तुमचे पुण्याचे पारडं जड असेल तर कोणतीही शक्ती तुमचे नुकसान करू शकत नाही असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला.

#### मी अपराजीत योध्दा

माणसाच्या जीवनात चुका होत असतात. मात्र जीवन जगत असताना नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवावी की आपलं पुण्याचं पारडं कधीही हलू द्यायचं नाही. मी तुमच्या सगळयांच्या आशिर्वादाने तुमच्यासमोर खासदार म्हणून उभा आहे. परमेश्वरानेच तुम्हाला बुध्दी दिली की चांगल्या माणसाच्या मागे उभे रहा. तरीही काहींना कळाले नाही. त्यांना वाटले समोरचे उमेदवार फार मोठे आहे. नीलेश लंके जिथे उभा राहतो तिथे आउटपुटच निघत असते. मी अपराजीत योध्दा असल्याचे लंके म्हणाले.

#### तर लोक हात पाहण्यासाठी तुमच्याकडे येतील !

साखरे महाराजांच्या मुखात सरस्वती आहे. वडगांव सावताळ येथील किर्तनात त्यांनी माझ्या लोकसभा निवडणूकीबाबत भविष्यवणी केली होती. त्यावेळी काही लोक हसले. मात्र महाराजांची भविष्यवाणी खरी ठरली. मी खासदार झालो. आता तर त्यांनी वेगळीच म्हणजे मंत्रीपदाची भविष्यवाणी केली आहे. महाराजांनी अशी भविष्यवाणी केली तर लोक किर्तन सोडून तुमच्याकडे हात दाखविण्यासाठी येतील अशी मिश्किल टीपन्नी खा. लंके यांनी केली.

#### तर तुमचे राजकारण शुन्य

मी परवा संध्याकाळी दिल्लीला गेलो होतो. सचिनचा फोन आला जमेल का ? आलो नसतो तर माझे सगळे लक्ष इकडेच लागले असते. माझ्या कुटूंबातला हा कार्यक्रम आहे. मी येणार नसेल तर राजकारण कशासाठी करायचे ? केवळ दिखावूपणासाठी करायचे नाही. आपण आपला परिवार जपला पाहिजे. तुम्ही सुख, दुःखात सहभागी होऊ शकले नाही तर तुमचे राजकारण शुन्य असते असे खा. लंके म्हणाले.

#### हे विश्वची माझे घर

नीलेश लंकेंचा परिवार नवरा, बायको, मुले, आई, वडील असा नाही. हे विश्वची माझे घर आहे. ज्याची परिवाराची व्याख्या संकुचित असते तो आयुष्यात काही करू शकत नाही. सगळे माझे मायबाप ही ज्याची भूमिका असते तोच चांगला काम करू शकतो असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

## केरळच्या बचावकार्यात निघोजच्या कन्येचे योगदान

### मेजर सीता शेळके यांच्या पथकाने तयार केला १९० फुटांचा पुल

वायनाड, केरळ : वृत्तसंस्था

**केरळमधील वायनाड जिल्हयात भुस्खलन होऊन ३०० हून अधिक लोकांचा जीव गेला. शेकडो लोके बेपत्ता आहेत. या बचाव कार्यात पारनेर तालुक्यातील मेजर सीता शेळके यांचे मोलाचे योगदान असून त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ३१ तासांमध्ये १९० फुटांचा पुल तयार बचाव कार्यात सुलभता आणली. बंगळुरूमधील लष्कराच्या मद्रास इंजिनिअरिंग ग्रुप मधील ७० जवानांच्या पथकातील सीता शेळके या एकमेव महिला अधिकारी आहेत.**

भुस्खलनामध्ये जखमींची संख्याही मोठी असून सध्या मुसळधार पावसात बचाव कार्य सुरू आहे. मेजर सीता शेळके यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केवळ ३१ तासांत मातीचा ढिगारा, मुळापासून उखडलेली झाडे बाजूला सारून वाहत्या नदीवर पुलाचे निर्माण केले. इतर जवानांप्रमाणेच या बचाव कार्यात सीता या न थकता, न थांबता अथक परिश्रम घेत आहेत.

हा पुल तयार करण्यासाठी मेजर सीता शेळके यांनी अथक परिश्रम घेतले. अनेक तासांपासून त्यांनी विश्रांतीही घेतली नाही. जेवण घेतले नाही. मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे वाहत्या नदीवर पुल उभा करणे तसे आव्हानात्मक काम होते. मात्र एमआयजीच्या जवानांनी आपले तांत्रीक कौशल्य पणाला लावून विक्रमी वेळेत पुल तयार केला. मद्रास सॅपर्स या नावाने ओळख असलेले हे पथक लष्करासाठी पुल तयार करण्याचे काम करते. युध्दादरम्यान तात्पुरते रस्ते तयार करणे, भुसुरूंगग शोधून तो नष्ट करणे अशी कामे या पथकाकडून केली जातात. नैसर्गिक आपत्तीमध्ये बचाव कार्यातही हे पथक योगदान देते. केरळमध्ये सन २०१८ मध्ये आलेल्या पुरामध्येही या पथकाने बचाव कार्य केले होते.



■ केरळ राज्यातील वायनाड जिल्हयात भुस्खलनामुळे ओढावलेल्या आपत्तीमध्ये निघोजच्या मेजर सीता शेळके या मोलाचे योगदान देत आहेत.

#### बचाव पथकाचा भाग याचा अभिमान

या बचाव कार्यात मी एकमेव महिला अधिकारी आहे असे समजू नका. मी सैनिक आहे. मी इथे भारतीय लष्कराचे प्रतिनिधित्व करत आहे. आणि मी बचाव कार्यात काम करणाऱ्या पथकाचा एक भाग आहे याचा मला अभिमान वाटतो. पूल बांधण्याचे श्रेय फक्त लष्कराचे नाही तर इथे काम करणाऱ्या प्रत्येकाचे आहे. अनेक यंत्रणांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले. स्थानिक यंत्रणा, राज्य सरकारचे अधिकारी आणि ठिकठिकाणाहून मदतीसाठी आलेल्या प्रत्येकाचे मी आभार व्यक्त करते. विशेष करून आजूबाजूच्या ग्रामस्थांचे आभार माणले पाहिजेत. त्यांच्या सहकार्याशिवाय हे कार्य अवघड होते. ज्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम तडीस नेले ते ब्रिगेडियर अजय सिंह ठाकूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आमचया एमआयजी केंद्रो ते कमांडरही आहेत. आमच्या पथकातील सर्व जवानांच्या सहकायूाने आम्ही हा पुल उभारू शकलो.

मेजर सीता अशोक शेळके

## आझाद ठुबेचा जामीन अर्ज फेटाळला

### सावकारी कायदा, फसवणूकीबाबत झालाय गुन्हा दाखल

पारनेर : प्रतिनिधी

**कान्हूरपठार येथील राजे शिवाजी पतसंस्थेचा चेअरमन तथा जिल्हा परिषदेचा माजी सदस्य आझाद ठुबे यास सावकारी कायदा तसेच फसवणूकीबाबत गुन्हा दाखल होऊन अटक झाल्यानंतर त्याने जामिन मिळावा यासाठी दाखल केलेला अर्ज पारनेरच्या न्यायालयाने फेटाळून लावला.**

राजे शिवाजी पतसंस्थेकडून कर्ज घेतलेल्या १२ कर्जदारांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून कर्जाची रक्कम परस्पर दुसऱ्या खात्यामध्ये वर्ग केल्याप्रकरणी आझाद ठुबे याच्यासह पोपट ढवळे व व्यवस्थापक संभाजी भालेकर यांच्याविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात सहकार खात्यामार्फत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर सर्व आरोपी पसार होते. दरम्यानच्या काळात आझाद ठुबे हा त्याच्या कान्हूरपठार येथील घरी आल्याची माहीती समजल्यानंतर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी आझाद



यास रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास अटक केली होती. न्यायालयाने त्यास अनक्रमे चार व दोन दिवसांची पोलीस कोठडी दिल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती. दरम्यान, न्यायालयान कोठडीत असतानाच आझाद ठुबे, व्यवस्थापक संभाजी भालेकर तसेच सर्व संचालकांवर ठेवींचे पैसे मिळत नसल्याने विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयीन उर्वरीत पान ३ वर










# युवा

## ...म्हणून जुन्या काळी टिकायचे जास्त काळ !



**आज आपल्या कुटुंबात २-४ लोक आहेत, पण तेदेखील आपण सांभाळू शकत नाहीत. अशा स्थितीत घरातील कामासाठी मोलकरीण, मुलांची काळजी घेण्यासाठी बेबी सिटर आणि घरातील उर्वरित कामे करण्यासाठी नोकर ठेवत आहोत. इतकं होऊनही घरात समस्या आणि कलह सुरूच असतो. शिवाय, आजकाल नाती लवकर संपवण्याचे प्रमाणही वाढले आहे. पण जर तुम्ही विचार केलात तर लक्षात येईल की जिथे आपण अशी छोटी कुटुंबे पाहत नाहीत, तिथे पूर्वीच्या काळात २० ते २५ किंवा त्याहूनही जास्त लोक एकत्र प्रेमाने आणि कोणतीही अडचण न ठेवता कसे जगायचे ? अशा मोठ्या बदलांची कारणे आम्ही तुम्हाला सांगत आहोत...**

- संयुक्त कुटुंब फायदेशीर होते : आज बहुतेक मुले-मुली लग्नानंतर कुटुंबापासून वेगळे राहू लागले आहेत. याचे एक कारण गोपनीयता, नोकरी किंवा इतर जबाबदाऱ्या टाळणे हे असू शकते, परंतु पूर्वी असे नव्हते. कुटुंबात कितीही मुलगे किंवा सून आली तरी घरापासून विभक्त होण्याबद्दल कोणी बोलायचे नाही. याचे मुख्य कारण म्हणजे जेव्हा आपण मोठ्या कुटुंबात राहतो तेव्हा जबाबदाऱ्या आपोआप विभागल्या जातात आणि कुठेतरी जायचे असेल तर मुलांना काका-काकू, आजी-आजोबा किंवा काका-काका यांच्याकडे बिनधास्त ठेवता येत होते.
- वडिलधाऱ्यांचे न ऐकणे : पूर्वीच्या काळी कुटुंबात इतके सदस्य होते की, लग्न झालेल्या जोडप्यात घरात भांडण झाले किंवा भाऊ आपापसात भांडले तर घरातील वडीलधारी मंडळी आपसात भांडण करून मतभेद मिटवत असत. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की मुले एकटे राहण्यासाठी कुटुंबापासून विभक्त होतात. त्यानंतर कुटुंबातील मोठ्यांना काही समजावून सांगायचे असले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आपल्या वडिलांचे न ऐकणे हे देखील आजकाल खराब संबंधांचे एक कारण आहे.
- घटस्फोट सामान्य बाब झालाय : जर तुम्ही तुमच्या आई-वडिलांकडून किंवा काकूंकडून त्यांच्या काळाबद्दल ऐकले असेल, तर हा उल्लेख कधीतरी आलाच असेल, त्यांच्या काळात घटस्फोट असे काही नव्हते. एकदा लग्न झाले की ते पूर्ण व्हायचे . पती-पत्नीमध्ये कितीही भांडण झाले तरी एकमेकांना घटस्फोट दिला जात नव्हता. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की, एखादे छोटीसे भांडण झाले की वादाची ठिणगी पेटते आणि मग प्रकरण संपुष्टात येण्यापर्यंत येते. कौटुंबिक हिंसाचार, मानसिक छळ आणि बळजबरी प्रकरणी आवाज उठवणे आणि घटस्फोट देणे योग्य आहे, परंतु निराधार कारणांसाठी नाते संपवणे चुकीचे आहे.
- संयम आणि प्रेम : आज हवं ते खाऊ न देणे, सहलीला न नेणे किंवा खरेदीसाठी न नेणे अशा छोट्या छोट्या गोष्टींवरून भांडणे सुरू होतात. पूर्वीच्या काळी असे होत नव्हते. स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही संयम आणि प्रेम होते. पूर्वी लोक कोणत्याही छोट्या छोट्या गोष्टीवर रागावून बसत नसत. उलट अशा गोष्टी विसरून नातं घट्ट करण्याचा प्रयत्न करत असत. पण आजच्या लोकांमध्ये संयमाचा फारच अभाव आहे.
- कमी आनंदी रहा : माझ्याकडे मोठे घर असावे, गाडी असावी, मुलांनी खासगी शाळेत शिकावे आणि आपण देश-विदेशात फिरावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. अशा भरमसाठ इच्छा तेव्हाच पूर्ण होऊ शकतात जेव्हा उत्पन्न जास्त असेल किंवा जास्त बचत असेल. यात शो ऑफचाही एक भाग आहे. पूर्वी असं नव्हतं, त्या काळी लोकं आपल्याकडे जे आहे किंवा जे काही मिळालं आहे त्यात आनंदी असायचे आणि मनमोकळेपणाने प्रेम द्यायचे.





## तिशी गाठल्यावर स्वतःला काय विचाराल?

**एका विशिष्ट वयानंतर, आपण सर्वजण अशा परिस्थितीत पोहोचतो जिथे मागे वळून पाहणे सोपे नाही. तिशीत पोहोचल्यावर याची जाणीव प्रकर्षाने होते. म्हणूनच ३० वर्षांचे होण्याआधी, वेळेत स्वतःला काही प्रश्न विचारा. कारण या काळात आपण आपल्या जीवनातील अनेक ध्येये, मूल्ये आणि यशांचे मूल्यांकन करतो. जेणेकरून आपण कोणत्या टप्प्यावर आहोत हे आपल्याला कळू शकेल. म्हणून, हे ६ प्रश्न स्वतःला विचारा आणि शक्य असल्यास त्यांची उत्तरे डायरीत लिहा...**

### कुटुंबासाठी काय करत आहे ?

आपल्या सर्वांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले कुटुंब, ज्यासाठी आपण काम करत आहोत आणि कमवत आहोत. पण तुम्ही जे करत आहात ते पुरेसे आहे का ? सहवास, पैसा आणि अन्न या आपल्या सामान्य गरजा आहेत, परंतु कुटुंब वेळ, प्रेम आणि सहवासाची मागणी करतात. स्वतःला विचारा, मी माझ्या कुटुंबासाठी काय करत आहे ? मी त्यांना वेळ देऊ शकतो का ? इत्यादी. जेव्हा तुम्हाला उत्तर मिळेल तेव्हा निश्चितपणे त्याचे मूल्यमापन करा.

- मी किती शिकलो ? : दिवसभर, आठवडाभर किंवा महिनाभर आपण काहीतरी नवीन शिकतो आणि काहीतरी विसरतो. अशा परिस्थितीत गेल्या काही वर्षांत तुम्ही नवीन काय शिकलात ? तुम्ही जे शिकलात ते तुम्ही किती अंमलात आणले किंवा कोणाला काही नवीन शिकवले हे प्रश्न स्वतःला विचारा आणि उत्तरे डायरीत लिहा. एक-दोन वर्षांनी जेव्हा तुम्ही ते वाचाल तेव्हा तुमच्या लक्षात येईल की तुम्ही किती शिकलात आणि असे काय होते जे तुम्हाला शिकायचे होते पण शिकता आले नाही.
- काय साध्य झाले किंवा करायचे बाकी आहे ? : दुसरा प्रश्न स्वतःला विचारायचा आहे की, तुम्ही आतापर्यंत काय साध्य केले आहे ? तुम्हाला जे वाटले होते ते तुम्ही साध्य केले का किंवा ज्या गोष्टी तुम्ही कधीच शक्य नव्हत्या तरीही त्या साध्य केल्या ? सर्व लक्ष्य साध्य झाले की नाही आदी... ३० व्या वर्षाच्या टप्प्यावर असतो तेव्हा आपण बऱ्यापैकी नोकरीत सेटल झालेलो असतो आणि अशावेळी लग्नाचीही घाई करतो. काहींचे योग्य वयातच लग्न झालेले असते.
- पुढील ५ वर्षात माझे भविष्य ? : ३० वर्षांचे वय हा मध्यम टप्पा आहे, ज्यामध्ये आपण प्रौढ नाही. अशा परिस्थितीत आपल्या भविष्याचा विचार करा, भविष्यात काय होईल ? आम्ही कुठे असू ? तुम्ही आणखी काय करत असाल ? ते आपल्या हातात नाही, पण ते कुठल्यातरी दिशेने नेणे आपल्या हातात नक्कीच आहे. म्हणूनच, पुढील ५ वर्षांमध्ये तुम्हाला स्वतःला कुठे आणि कोणत्या टप्प्यावर पहायचे आहे हे शोधण्यासाठी आताच कठोर परिश्रम सुरू करा.



### मी आनंदी आहे का ?

या एका प्रश्नाचे उत्तर तुम्हाला आयुष्यात कुठे उभे आहे हे समजण्यास मदत करेल. पण हेदेखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे की जीवन हा एक प्रवास आहे. त्याच्या मार्गात तुम्हाला अनेक चढउतारांना सामोरे जावे लागेल. जर तुम्ही तुमच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित केले आणि कठोर परिश्रम केले तर तुम्हाला यश नक्कीच मिळेल आणि यश आणि आनंद तुमच्या पायांचे चुंबन घेईल.

- पुढे जाण्यापासून काय रोखत आहे ? : जेव्हा आपण आयुष्यात पुढे जात असतो तेव्हा प्रत्येक कंपनी किंवा प्रत्येक संस्था आपल्याला पुढे घेऊन जाईलच हे आवश्यक नसते. काही वेळा अशा काही गोष्टी असतात ज्या आपल्याला पुढे जाण्यापासून थांबवतात आणि आपली वाढ खुंटतात. अशा परिस्थितीत, ज्या गोष्टी तुम्हाला पुढे जाण्यापासून रोखत आहेत त्यांचा विचार करणे आणि त्या सोडण्याचा किंवा त्या सुधारण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे आहे.



## जोडीदाराकडून या गोष्टी मागाव्या लागत असतील तर नातं आजच संपवा!

**आजच्या काळात कोणतंही नातं टिकवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. नाहीतर ते नातं कधी कमकुवत व्हायला लागतं आणि कधी संपण्याच्या मार्गावर येऊन ठेपतं हेही कळत नाही. तथापि, आपण आपले नाते जपण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. परंतु जर तुमचे नाते अशा टप्प्यावर पोहोचले असेल की तुम्हाला वेळ आणि आदर यासारख्या छोट्या गोष्टींची मागणी करावी लागत असेल तर तुम्ही नाते संपवण्यासाठी पावले उचलली पाहिजेत...**

- वेळ मागावा लागतोय ? : अनेकदा असे दिसून येते की कोणत्याही नात्याच्या सुरुवातीला लोक आपल्या जोडीदारावर खूप प्रेम करतात आणि आपला सर्व वेळ देतात. घरात असो की बाहेर एकमेकांसाठी वेळ काढल्याने नाती मजबूत होतात आणि सुधारतात. पण जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून स्वतःसाठी वारंवार वेळ मागावा लागत असेल, तर तुमची किंमत समजून घ्या आणि नाते संपवा.
- लक्ष देत नाही ? : जर तुमचा जोडीदार तुमच्याकडे लक्ष देत नसेल तर त्याने लक्ष द्यावे म्हणून तुम्हाला प्रयत्न करावे लागत असतील तर तुमच्या नात्यातील कमकुवतपणा दर्शवते. हे वारंवार घडत असेल तर धोक्याची घंटा आहे. स्वतःचे आणि वेळेचे महत्त्व समजून एकदा जोडीदाराशी बोला. जर तो अजूनही समजत नसेल तर संबंध संपवणे योग्य आहे.
- सन्मान मागावा लागतो ? : कोणत्याही नात्याचा पाया हा परस्पर आदर असतो आणि जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला तुमचा आदर करायला सांगावे लागत असेल तर आजच्या शब्दात सांगायचे तर तो मोठा लाल झेंडा आहे. अशा रिलेशनशिपमध्ये राहू नका. ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या पार्टनरला तुमचा आदर करण्यास सांगावे लागेल.
- वचनबद्धता नसणे : दोन्ही बाजूंनी दृढ वचनबद्धता गरजेची असते. ती पूर्ण होते तेव्हाच कोणतेही नाते पुढे जाते. परंतु जर तुमचा सोबती दृढ वचनबद्धतेपासून मागे राहत असेल किंवा असे करण्यास घाबरत असेल, तर तिला तिच्या भावनांबद्दल खात्री नाही. म्हणून अशा व्यक्तीशी संबंध ठेवू नका.
- एकनिष्ठ राहण्यासाठी विचारावे : जेव्हा तुम्ही नातेसंबंधात असता तेव्हा तुमच्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहणे सर्वात महत्त्वाचे असते. कुणालाही असाच जोडीदार हवा असतो. त्यामुळे प्रामाणिक राहा. पण तुमच्या विश्वासाला महत्त्व नसलेल्या किंवा तुमच्याशी एकनिष्ठ नसलेल्या नात्यात असण्याची भीती बाळगू नका. जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला एकनिष्ठ राहण्यास सांगावे लागत असेल तर हे नाते पुढे नेणे योग्य नाही.



## जोडीदाराशी जवळीक वाढवणारे ५ प्रश्न!

**तुमचे प्रेमाचं किंवा लग्नाचं नातं घट्ट होण्यासाठी तुम्ही काय करता ? जर तुमचे उत्तर काहीच नाही, फक्त एकत्र राहता, फिरता असं असेल तर तुम्ही दोघे एकमेकांच्या तितके जवळ नसाल जितके तुम्ही असायला पाहिजेत. तुमच्या जोडीदाराशी जवळीक आणि तुमच्या नात्यात ताकद तेव्हा येते जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करता. तुमच्या जोडीदाराला चांगले ओळखण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समोरासमोर संवाद आणि प्रश्न विचारणे. तुमच्या जोडीदाराला काय विचारायचे या संभ्रमात असाल तर तुम्ही आम्ही दिलेले ५ प्रश्न करून पाहा. हे ५ प्रश्न तुम्हाला तुमच्या जोडीदाराला जाणून घेण्यास मदत करतील आणि तुम्हाला एकमेकांच्या जवळ आणतील...**



- पहिला प्रश्न : तुमच्या जोडीदाराशी बोलत असताना तिला विचारा की, अशी कोणती गोष्ट होती जी तुला अजूनही त्रास देत आहे ? तुमचा हा प्रश्न तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या वेदनांची कल्पना तर देईलच पण तुमच्या शब्दांचा योग्य वापर करण्यासही मदत करेल. याशिवाय मनातील बोलण्याने तुमच्या जोडीदाराचे मनही हलके होईल.
- दुसरा प्रश्न : आणखी एक प्रश्न तुम्ही तुमच्या जोडीदाराला विचारू शकता, तुझ्याबद्दल अशी कोणती गोष्ट आहे जी मला समजत नाही किंवा समजणे कठीण आहे ? प्रत्येक नात्याला चांगले स्थान देण्यासाठी हा प्रश्न विचारणे खूप महत्त्वाचे आहे. कधीकधी परिस्थिती अशी बनते की आपण आपल्या जोडीदाराबद्दल गैरसमज करून घेतो किंवा तिच्या बोलण्याकडे अनावश्यक समजून दुर्लक्ष करतो. अशा परिस्थितीत, तिला हा प्रश्न विचारा आणि गोष्टी स्पष्ट करा.
- तिसरा प्रश्न : हा एक प्रश्न आहे जो तुमच्या नात्याला योग्य मार्गावर नेऊ शकतो. तुमच्या जोडीदाराला हा प्रश्न विचारा, आपल्या नात्यात तुला सर्वात जास्त कशाची भीती वाटते ? जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराला हा विचारता तेव्हा तिचे लक्षपूर्वक ऐका, ते तुम्हाला तुमचे नाते जतन करण्यासाठी भविष्यात आवश्यक पाऊल उचलण्यास मदत करेल.
- चौथा प्रश्न : प्रत्येक मुलगा किंवा मुलीला आपल्या जोडीदाराकडून ऐकावेसे वाटणारे वाक्य म्हणजे माझ्यात इतरांपेक्षा वेगळे काय आहे ? वचनबद्ध होण्यापूर्वी, आपण अनेकांना डेट करतो किंवा चाचणी करतो पण फक्त एकाच व्यक्तीसोबत नातं पुढे जाते. कारण आपल्या जीवनसाथीमध्ये आपल्याला हवे असलेले सर्व गुण आपल्याला तिच्यामध्ये दिसतात. विशेषतः जेव्हा तुम्ही जोडीदाराला हा प्रश्न कराल तेव्हा तिला मनापासून आनंद होतो की तुम्ही तिची स्तुती करत आहात.
- पाचवा प्रश्न : तुम्ही तुमच्या जोडीदाराला दर सहा महिन्यांनी किंवा वर्षातून एक प्रश्न विचारला पाहिजे, जर तू आपल्या नात्यातील एक गोष्ट बदलू इच्छित आहे तर ती काय असेल ? हा एक असा प्रश्न आहे जो तुमचं नातं मजबूत करेलच, पण तुमच्या चुका सुधारण्याची संधीही देईल. त्यामुळे या प्रश्नांची उत्तरे आज किंवा या आठवड्यात तुमच्या जोडीदारालाही विचारायला हवीत आणि एकमेकांची जवळीक वाढवावी.

## शॉर्ट न्यूज

### बेलापूर रेल्वे स्थानकाचे काम युद्धपातळीवर सुरू

■ **श्रीरामपूर :** येथील बेलापूर रेल्वे स्थानकाचा अमृत भारत योजनेत समावेश झाला आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक एकचे काम प्रगतिपथावर असून, येथे वेटिंग रूम, फूड मॉल, वॉटर वेंडिंग मशीन, अशा सुविधा मिळणार आहेत. रेल्वे स्थानकाच्या कामामुळे सध्या कोच डिस्प्ले बंद आहेत. मात्र, तरीही स्थानकावर येणाऱ्या रेल्वे गाड्यांची तसेच कोचच्या क्रमांकांची माहिती एका स्क्रिनवर दिली जाते. याशिवाय रेल्वे गाड्यांच्या आगमनाविषयी अनाउन्समेंट वेळेवर केली जाते.

### डाळिंबाला २५५ रुपये किलो भाव

■ **राहाता :** बाजार समितीत डाळिंबाच्या ७१६० क्रेटसची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला किमान १७६ रुपये तर जास्तीत जास्त २५५ रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला किमान १११ रुपये तर जास्तीत जास्त १७५ रुपये. डाळिंब नंबर ३ ला किमान ४६ ते जास्तीत जास्त ११० रूपये. डाळिंब नंबर ४ ला किमान १० रुपये तर जास्तीत जास्त ४५ रुपये असा भाव मिळाला. सोयाबीनची १ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला सरासरी ४२५० रुपये भाव मिळाला. बाजरीला सरासरी २१५० रुपये भाव मिळाला. ज्वारीला सरासरी २५५१ रुपये भाव मिळाला.

### विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व साहित्य वाटप

■ **नेवासा :** लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून भाजप नेते मनोज पारखे यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व साहित्य वाटप केले. नेवासा शहरातील बदामबाई गांधी विद्यालयातील कार्यक्रमात प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी भाजपचे युवा नेते मनोज पारखे, मुख्याध्यापक विश्वनाथ नानेकर व आदिनाथ पटारे आदी उपस्थित होते. पारखे यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या खडतर जीवन प्रवास व देश आणि समाज सुधारणा विषयी त्यांनी केलेले कार्याबाबत माहिती दिली.

### बार असोसिएशनचे प्रश्न सोडविण्याची ग्वाही

■ **कोपरगाव :** नवीन न्यायालयाच्या इमारतीचे काम सुरु असल्यामुळे तीन मजली न्यायालयात सर्वच न्यायालयांचे काम सुरु आहे. त्यामुळे या न्यायालयाच्या इमारतीमध्ये लिप्ट बसवावी या प्रमुख मागणीसह बार असोसिएशनचे सर्व प्रश्न सोडविणार असल्याची ग्वाही आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे. कोपरगाव बार असोसिएशनच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या आहेत. यामध्ये बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. अशोकराव वहाडणे, उपाध्यक्षपदी ॲड. रमेश गव्हाणे, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा आ. आशुतोष काळे यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

### वडुले खुर्द ते चव्हाणवाडी रस्त्याचे भूमिपूजन

■ **शेवगाव :** तालुक्यातील वडुले खुर्द ते चव्हाणवाडी रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरण कामाचे भूमिपूजन आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बापू नाना पाटेकर, भीमराज सागडे, निंबेनांदूरचे सारंगधर बापू बडे, प्रशांत बडे, ढोरजळगाव नेचे मा. सरपंच अनंता उकिर्डे, उपअभियंता प्रल्हाद पाठक, ठेकेदार विष्णू तवले, वडुले खुर्दचे सरपंच भाऊसाहेब आव्हाड, मा. सरपंच नारायण आव्हाड, ग्रा. पं. सदस्य अजिनाथ आव्हाड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक आजिनाथ आव्हाड यांनी केले. सरपंच भाऊसाहेब आव्हाड यांनी आभार मानले.

# तुम्ही फक्त परिवर्तनाची खुणगाठ बांधा!

## महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन

**संगमनेर : प्रतिनिधी**

**तालुक्यात परिवर्तन करण्याची मानसिकता ही मतदारांची झाली आहे. उमेदवार कोण असेल याचा फार विचार न करता महायुतीचा आमदार आपल्याला करायचा आहे ही खुणगाठ मनाशी बाळगा, डॉ.सुजय विखे यांच्या उमेदवारीचा आग्रह कार्यकर्त्यांचा असला तरी, याबाबत महायुतीचे नेतेच निर्णय घेतील. तुम्ही कार्यकर्त्यांनी फक्त तालुक्यात परिवर्तन करण्याची खुणगाठ मनाशी बाळगा यश आपलेच आहे असे आवाहन महसूल, पशुसंवर्धन आणि दूग्ध व्यवसाय विकास मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.**



तालुक्यातील गुंजाळवाडी येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात मंत्री विखे पाटील यांनी आक्रमकपणे नाव न घेता आ.बाळासाहेब थोरात यांच्यावर जोरदार टिकास्त्र सोडले. मराठा आरक्षणा संदर्भात महाविकास आघाडीचे नेते बोलायला तयार नाही. आ.बाळासाहेब थोरात सुध्दा आरक्षणाच्या बाबतीत गप्प बसून आहेत. या राज्यात चार वेळा मुख्यमंत्री पदाची संधी मिळूनही शरद पवार यांनी मराठा समाजाला न्याय दिला नाही. मंत्री विखे पाटील म्हणाले की, या तालुक्याचे नेते सुध्दा मराठा आरक्षणावर चुप्पी घेवून बसले आहेत. तालुक्यात वाढलेल्या लव्ह जिहादच्या घटनांबाबतही या तालुक्याचे पुढारी गंभीर नसल्याचा थेट आरोप त्यांनी आपल्या भाषणात केला.

हा तालुका आपल्याला लॅन्ड माफीया आणि भूमाफीयांच्या ताब्यातून मुक्त करायचा आहे. यापुर्वी सर्व शासकीय कार्यालये यशोधन कार्यालयातून चालविली जायची. आज महायुती सरकारची ताकद जनतेच्या पाठीशी उभी आहे. मोठ्या प्रमाणात विकास कामांना निधी उपलब्ध करुन दिला असून, शासकीय योजनांचा लाभही जनतेला मिळत आहे. मात्र एकीकडे महायुती सरकारवर टिका करायची आणि दुसरीकडे योजनांसाठी गावोगावी फिरायचे ही दुटप्पी भूमिका आता महाविकास आघाडीच्या नेत्यांची उघड झाली आहे. त्यामुळे जनतेच्या मनात धुळफेक करणे थांबवा. लोकसभा निवडणूकीत महायुतीच्या उमेदवाराला मिळालेली मतं ही परिवर्तनाची नांदी आहे असे सुचक वक्तव्य त्यांनी केले.

लोकसभा निवडणूकीत नकारात्मक प्रचार करुन, महाविकास आघाडीला विजय मिळाला असला तरी, ते वातावरण आता राहीले नाही. महायुती सरकारने वीज बिल माफी पासून ते मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहिर करुन, समाज घटकाला मोठा आधार दिला आहे. राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असल्याचा विश्वास व्यक्त करुन, या तालुक्यात परिवर्तन करायची खुणगाठ मनाशी बाळगा असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.सुजय विखे पाटील यांनी तालुक्यात निवडणूक कोण लढविणार यापेक्षा महायुतीचा उमेदवार आपल्याला निवडून आणायचा आहे. यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात लोकांशी संपर्क करावा लागेल. उमेदवार हा कोणाच्याही दबावाला बळी पडणारा नसावा. परिवर्तनाचा संकल्प तुम्ही केला तरच, महायुतीला यश मिळू शकते. सामान्य माणसाला आपल्याला विश्वास द्यावा लागेल. भविष्यात तालुक्यातील कुठल्याही गावात मी आता भेटी द्यायला सुरुवात करणार आहे. पुढाऱ्यांपेक्षा सर्वसामान्य जनतेला आमच्यापर्यंत पोहोचू द्या.

काही राजकीय निर्णय करताना कार्यकर्त्यांनाही मन मोठ ठेवावं लागेल असे सुचित करुन, विखे पाटील परिवाराला घेरण्यासाठी अनेकजण आता सज्ज झाले आहेत. मात्र या तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचे पाठबळ हेच आमच्या दृष्टीने महत्वाचे असल्याचे विखे पाटील म्हणाले.

# श्रावण महिना : तिथी आणि महत्त्व



भगवान शंकरांना प्रिय असणारा हा श्रावण महिना अतिशय पवित्र मानला जातो. या महिन्यात भगवान शंकराची आणि देवी पार्वतींची खास पूजा केली जाते. महादेवांना समर्पित असणारी विविध व्रतवैकल्ये याच महिन्यात केली जातात. हा संपूर्ण महिना भगवान शंकरांनाच समर्पित आहे. ही व्रतवैकल्ये मनोभावे केल्याने भगवान शंकरांची आपल्यावर कृपा राहते, अशी धार्मिक मान्यता आहे.

उत्तर भारतीय पंचांगानुसार २२ जुलैला श्रावण महिना सुरू होतोय, तर आपल्याकडे महाराष्ट्रात दक्षिण भारतीय पंचांगानुसार ५ ऑगस्ट २०२४ ला श्रावण मासारंभ होणार आहे. श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीपासून हा श्रावण महिना सुरू होणार आहे.

यंदा महाराष्ट्रात हा श्रावण महिना ५ ऑगस्टपासून (सोमवारी) सुरू होणार असून, यावेळी ५ श्रावणी सोमवार येणार आहेत.

यंदा श्रावण महिना ऑगस्टमध्ये सुरू होणार आहे. ५ ऑगस्टला (सोमवारी) श्रावण शुक्ल प्रतिपदेपासून हा श्रावण महिना सुरू होणार आहे तर 3 सप्टेंबर २०२४ ला श्रावण अमावस्येच्या तिथीला श्रावण महिन्याची समाप्ती होणार आहे. यंदा श्रावण महिन्यात ५ श्रावणी सोमवार आहेत.

**श्रावण महिन्याचे महत्व**

सोमवार हा भगवान शंकरांचा वार आहे. त्यामुळे, श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी श्रावणी सोमवारचे व्रत केले जाते. या दिवशी अनेक जण उपवास करतात. भगवान शंकरांची मनोभावे पूजा करतात. हा महिना धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्वाचा मानला जातो. कारण, याच महिन्यात नागपंचमी, रक्षाबंधन, विनायक चतुर्थी, संकष्टी चतुर्थी, शितला सप्तमी, दुर्गाष्टमी, कालाष्टमी असे महत्वाचे सण-उत्सव आहेत. या सर्व सण-उत्सवांमुळे या श्रावण महिन्याचे महत्व अधिक वाढते.

**यंदा किती श्रावणी सोमवार?**

श्रावण महिन्यात दरवर्षी ४ श्रावणी सोमवार येतात. परंतु, यंदाच्या श्रावण महिन्यात ५ श्रावणी सोमवार आहेत. या काळात देशातील भगवान शंकरांच्या १२ प्रसिद्ध ज्योतिर्लिंगांना असंख्य भाविक भेट देतात आणि महादेवांची मनोभावे पूजा करतात.यंदा ५ ऑगस्ट २०२४ ला पहिल्या श्रावणी सोमवारचे व्रत केले जाणार आहे. त्यानंतर, १२ ऑगस्टला दुसऱ्या श्रावणी सोमवारचा उपवास केला जाईल आणि १९ ऑगस्टला तिसऱ्या श्रावणी सोमवारचे व्रत केले जाणार आहे. त्यानंतर, चौथा श्रावणी सोमवार हा २६ ऑगस्टला आहे आणि शेवटचा पाचवा श्रावणी सोमवार हा २ सप्टेंबर २०२४ ला साजरा केला जाईल. याच दिवशी श्रावणी अमावस्या देखील आहे.

- पहिला श्रावणी सोमवार ५ ऑगस्ट २०२४
- दुसरा श्रावणी सोमवार १२ ऑगस्ट २०२४
- तिसरा श्रावणी सोमवार १९ ऑगस्ट २०२४
- चौथा श्रावणी सोमवार २६ ऑगस्ट २०२४
- पाचवा श्रावणी सोमवार २ सप्टेंबर २०२४

(पान १ वरून)

### आझाद ठुबेचा जामीन अर्ज फेटाळला

कोठडीत असताना आझाद याच्या वकीलाने पारनेरच्या न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी होऊन ठुबे याच्या वकीलांनी या गुन्हयाशी ठुबे याचा थेट संबंध नाही, ही घटना घडली त्यावेळी ठुबे हा उपस्थित नव्हता. सावकारी अधिनियमाच्या अनुषंगाने ठुबे याच्यावर गुन्हा दाखल होत नाही. प्रत्येक कर्जदाराने वेळोवेळी कर्ज काढले आहे. ओळखीच्या व्यक्तीच्या खात्यावर ते वर्ग केले आहे. आणि ही रक्कम पुन्हा संस्थेत जमा झाली आहे. ठेवींसंदर्भात दाखल करण्यात आलेला गुन्हाही खोटा असल्याचा दावा ठुबे याच्या वकीलांनी करत युक्तीवाद केला होता.

सरकार व पोलीसांच्या वतीने सरकारी अभियोक्ता सचिन पटेकर यांनी युक्तीवाद केला. ६ कोटींची रक्कम हा एक दिवसाचा विषय नाही. ही मोठी प्रक्रिया आहे. संस्थेमार्फत कर्जदारांकडून चेक तसेच स्टॅम्प आगाऊ घेऊन ठेवण्यात आले होते. वेळेनुसार ते वापरण्यात आले. ताबा पावतीसाठी सहा महिन्यांपूवी स्टॅम्प घेण्यात आला होता. कर्जदारांची सर्व कागदपत्रे तसेच स्टॅम्पचा गैरवापर करण्यात आला तो ठुबे याच्या सांगण्यावरून करण्यात आला. कोणताही निर्णय हा संचालक मंडळाच्या बैठकीत होतो. सर्व प्रक्रिया तपासणे ही संचालक मंडळाची जबाबदारी असते. या गुन्हयाशी ठुबे व इतरांचा थेट संबंध नसला तरी अप्रत्यक्ष संबंध असल्याने ठुबे याच्या जामीनास अभियोक्ता पटेकर यांनी कडाडून विरोध दर्शविला. न्यायालयाने पटेकर यांचा युक्तीवाद मान्य करून ठुबे याचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

## वाचकांच्या लेखणीतून

### त्याग आणि भोग

पाश्चात्य संस्कृती भोगाला नको तेवढे महत्त्व देते. त्यांच्या भोगवादी वृत्तीलाच आपण चंगळवाद म्हणतो.

भारतीय संस्कृतीत त्याग आणि भोग यांचे विधान आहे. या दोन्हीत त्यागाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. तिने भोग नाकारला नाही. भोगाला ती गौणत्व देते, एवढेच.



श्रीराम प्रभू राजसिंहासनावरचा अधिकार त्याग करुन वनवासाला गेले असे रामायणात वर्णन आहे.

इतिहासपुराणांत यांचे किती तरी दाखले मिळतील. पूज्य विनोबाजींची भूदान चळवळ ही त्यागवृत्तीचेच दर्शन होते. ते म्हणत, जो देतो तो देव. जो राखून ठेवतो तो राक्षस. यात दानाचे महत्त्व दिसले तरी त्यांच्या मुळाशी त्याग वृत्तीच आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

त्याग गणिती पध्दतीने वाढत जाणारी वृत्ती आहे. १, २, 3..... अशा पटीने वाढणारी. भोग वृत्ती ही भौमितिक पटीने वाढणारी वृत्ती आहे. १, २, ४, ८, १६.... या पटीने ती वाढते. म्हणूनच त्यागवृत्तीला महत्त्व आहे. तिचेच गुणगान आपली संस्कृती करते.

भूक लागली असता जो आपली भाकरी खातो ती प्रकृती. जो दुसऱ्याला भाकर खाऊ देत नाही, ती विकृती आणि जो आपली अर्धी भाकरी गरजूला खाऊ घालतो ती संस्कृती! सुप्रसिध्द मराठी साहित्यिक पु.ल. देशपांडे यांचे हे विचार भारतीय त्यागवृत्तीचेच दर्शन मांडणारी विचारसरणी आहे.

■ नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# विद्युत रोहित्रांची क्षमता वाढवा, अन्यथा उपोषण

## निवारा, येवला रोड भागातील नागरिकांचा इशारा

**कोपरगाव : प्रतिनिधी**

**कोपरगाव शहरातील निवारा, येवलारोड परिसरात विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांनाच त्याचा त्रास होत आहे. त्यामुळे रोहित्रांची क्षमता वाढवावी, अन्यथा उपोषण करण्यात येईल, असा इशारा माजी नगरसेवक जनार्दन कदम यांनी दिला.**



माजी नगरसेवक जनार्दन कदम यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी वीज वितरण कंपनीचे कोपरगाव शहर विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय धांडे यांना यासंदर्भात निवेदन दिले. रोजच लाइट जाण्याचे प्रमाण वाढले आहे. यापूर्वी वरील परिसरासाठी नवीन रोहित्र व जुन्या असलेल्या रोहित्रांची क्षमता वाढवून देण्याची मागणी केली होती. तरी देखील या भागाचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही.

त्यामुळे नागरिक, विद्यार्थी व व्यापारी यांचे आर्थिक, शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे कोपरगाव शहरातील निवारा, सुभद्रानगर, रिद्धी सिद्धी नगर, जानकी विश्व कॉलनी व येवला रोड येथील रोहित्राची क्षमता वाढवावी. यावर कार्यवाही न झाल्यास उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. निवेदन देण्यासाठी माजी नगरसेवक जनार्दन कदम, बापूसाहेब इनामके, सुमित भोंगळे, सिद्धार्थ पाटणकर, कृष्णा गवारे, ओम उदावंत, दशरथ सरवन, संतोष बैरागी आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION + OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
१ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# खा.नीलेश लंके यांचा रविवारी सावरगावला नागरी सत्कार

## युवा नेते रवींद्र गायखे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

सावरगाव : प्रतिनिधी

**नगर दक्षिणचे खासदार नीलेश लंके यांचा सावरगाव ग्रामस्थांच्या वतीने जाहीर नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सावरगावचे युवा नेते ग्रामपंचायत सदस्य अहमदनगर राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र गायखे यांच्या वाढदिवसानिमित्ताने दि. ४ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

खासदार नीलेश लंके यांचा सत्कार सोहळा व रवींद्र गायखे यांचा वाढदिवस सोहळा एकत्रित आयोजित करण्यात आला असून या निमित्ताने विविध विकास कामांचे उद्घाटन तसेच सामाजिक उपक्रम सावरगाव येथे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली.

दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी सावरगाव येथे विविध रस्त्यांचे भूमिपूजन



व उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई नीलेश लंके यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे तसेच यावेळी वृद्धांना काठी वाटप शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप वृक्षारोपण असे विविध सामाजिक कार्यक्रम तसेच संध्याकाळी ह. भ. प. कविराज महाराज झावरे यांचे कीर्तन होणार आहे. रात्री आठ वाजता सत्कार व वाढदिवस समारंभ आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर उपस्थित सर्व ग्रामस्थांना व स्नेह भोजनाचे आयोजन रवींद्र गायके मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सावरगाव येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभा मंडप काळेवाडी या ठिकाणी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी टाकळी ढोकेश्वर पारनेर नगर या भागातून मोठ्या संख्येने राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे अशी माहिती संयोजकांच्या वतीने सांगण्यात आली.

### पारनेर तालुक्याचा अभिमान

**विकासाभिमुख नेतृत्व सर्वसामान्यांचे लोकनेते नीलेश लंके हे नगर दक्षिणचे खासदार झाले या निमित्ताने त्यांचा जाहीर नागरी सत्कार व विविध विकास कामांचे उद्घाटन आणि धार्मिक सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

**रवींद्र गायखे**
( जिल्हाउपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी, अहमदनगर)

# श्री समर्थ बी.एड महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

## यंदाचाही निकाल शंभर टक्के

पारनेर : प्रतिनिधी

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीएड द्वितीय वर्षाच्या मे २०२४ ला झालेल्या वार्षिक परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत श्री समर्थ अकॅडमीच्या श्री समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च (बी.एड.) म्हसणे फाटा ता. पारनेर, महाविद्यालयाचा निकाल १०० टकके लागला आहे अशी माहिती प्राचार्य डॉ.अरुणा भांबरे यांनी दिली.**

महाविद्यालयातील विद्यार्थिनी धुमाळ ज्योती संग्राम ७९.४०% गुणांनी प्रथम, जोशी स्नेहल विभाकर ७९.०५% गुण



मिळवून द्वितीय, कटके स्वाती जयवंत ७८.७०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. तर गुंड रोहिणी ७८.४०% व भांबरे अनुजा ७८.२५% गुण मिळवून अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळवला. महाविद्यालयातील २२ विद्यार्थी ओ ग्रेड मध्ये, २४ विद्यार्थी ए + ग्रेड मध्ये व १० विद्यार्थी ए ग्रेड मिळवून उत्तीर्ण झाले.

श्री समर्थ अकॅडमीचे सर्व पदाधिकारी,संचालक कैलास गाडीलकर व शिल्पा गाडीलकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. अरुणा भाबरे, प्रा. सुभाष पवार, प्रा. स्वाती मेहेत्रे , प्रा. प्रेमकुमार पालवे, प्रा. प्राजक्ता प्रभू, प्रा. विद्या कोळी, प्रा रोहिणी गोरे, श्री.दिलीप कोळपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# पारनेरमध्ये रविवारपासून भडकणार मशाल!

## ■ भगवा सप्ताहनिमित्त यात्रेचे आयोजन ■ डॉ.श्रीकांत पठारे यांचे नेतृत्त्व ■ तालुक्यातील सर्व गावांमध्ये यात्रा पोहचणार

पारनेर : प्रतिनिधी

**शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे निवडणुक चिन्ह मशाल व पक्षाची विचारधारा प्रत्येक गावात, वाड्या वस्त्यांवर पोहचविण्यासाठी पक्षाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात भगवा सप्ताह आयोजित करण्यात येत आहे. पारनेर तालुक्यातही तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्त्वाखाली भगवा सप्ताहनिमित्त भव्य मशाल यात्रेचे आयोजन करण्यात आले असून या यात्रेचा शुभारंभ ४ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता टाकळी ढोकेश्वर येथून होणार आहे. ही यात्रा दि. ४ ऑगस्ट ते दि. ११ ऑगस्ट या दरम्यान शिवसेना तालुकाप्रमुख श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तालुक्यातील गावांमध्ये व वाड्या वस्त्यांवर जाणार आहे.**



शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना आदर्श मानून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने या भगव्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भगवा सप्ताह निमित्ताने पारनेर तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण व प्रत्येक गावामध्ये भव्य मशाल यात्रा निघणार असून या माध्यमातून शिवसेनेची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी व येणाऱ्या विधानसभेला पक्षांचे चिन्ह सर्वसामान्य पर्यंत पोहोचविण्यासाठी हा भगवा सप्ताह व मशालयात्रा आयोजित करण्यात आली आहे अशी माहिती शिवसेना तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांनी दिली आहे.

डॉ.श्रीकांत पठारे यांच्या नेतृत्त्वाखाली या यात्रेमध्ये प्रत्येक गावातील नागरिकांच्या अडीअडचणी शिवसैनिक समजावून घेणार असून त्यावर यात्रा संपल्यानंतर सर्व समस्या सोडविण्यावर शिवसेनेच्या वतीने भर दिला जाणार आहे. तसेच ही यात्रा गावागावामध्ये वाड्या वस्त्यांवर जाऊन नागरिकांशी संवाद साधनार आहे, उध्दव ठाकरे यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडविण्यासाठी नागरिकांच्या सूचना व त्यांचे विचार समजावून घेऊन त्यावर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शिवसैनिक काम करणार असून याबाबतचा अहवाल पक्ष नेतृत्वाला पोहचविणार असल्याचे डॉ.श्रीकांत पठारे यांनी सांगितले आहे.

या यात्रेमध्ये तालुक्यामधील शिवसैनिक, पक्षाचे सर्व पदाधिकारी व नागरिक मोठ्या संखेने उपस्थित राहणार असून तालुक्यातील सर्वच नागरिकांनी यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. श्रीकांत पठारे यांनी केले आहे.

# बापूसाहेब गावडे विद्यालयाला रोटरीची मदत

## विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साधनांची भेट

निघोज : प्रतिनिधी

**रोटरी क्लब ऑफ पुणे फार ईस्ट च्या वतीने सुतत्ती एंटरप्राइजेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सी.एस.आर. मधून रोटरी ई लर्निंग सेट प्रोजेक्ट अंतर्गत मा. बापूसाहेब गावडे माध्यमिक विद्यालय म्हसे बु या विद्यालयामध्ये ई लर्निंग सेट बसविण्यात आला. यामध्ये मोठा दुरचित्रवाणी संच उपलब्ध करून देण्यात आला आहे.**

या दूरचित्रवाणी संचाच्या माध्यमातून त्यामध्ये असलेल्या शैक्षणिक सॉफ्टवेअर च्या साह्याने वर्गामध्ये शिकणे व शिकविणे ही




प्रक्रिया अधिक सोपी तसेच मनोरंजक बनणार आहे. या दूरचित्रवाणी संचामध्ये इयत्ता पहिली ते दहावीचा संपूर्ण अभ्यासक्रम ॲनिमेशनच्या स्वरूपात दिलेला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना अधिक परिणामकारकपणे शिक्षण देता येणार आहे.

ॲनिमेशनच्या माध्यमातून संकल्पना स्पष्ट करणे आणि समजावून घेणे अधिक सोयीस्कर बनणार आहे. विद्यालयामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी तसेच गरजू कुटुंबातील विद्यार्थी शिकत आहेत. त्यांना देखील उच्च तंत्रज्ञानाच्या साह्याने शिक्षण घेणे शक्य होणार आहे.

विद्यालयांमध्ये ई लर्निंग सेट बसवण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पुणे फार ईस्टचे ज्येष्ठ रोटेरियन श्री पंकज पटेल सर यांचे सहकार्य लाभले. तसेच या प्रोजेक्टसाठी रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे माजी अध्यक्ष धनंजय राजूरकर यांनी समन्वय साधला. आणि विद्यालयातील शिक्षक शमीर हावलदार यांनी यासाठी रोटरी क्लब कडे पाठपुरवठा केला.

# एसटी बसमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनीची छेडछाड !

## रांजणगाव पोलिसांकडून परप्रांतीय तरुणाला अटक

शिरुर : प्रतिनिधी

**पुण्याहून शिरुरकडे निघालेल्या एका एसटी बसमध्ये महाविद्यालयीन तरुणीची छेडछाड केल्याप्रकरणी आज सकाळी एका तरुणाला रांजणगाव पोलिसांनी अटक केली आहे.**

याबाबत सविस्तर माहिती अशी पुण्याहून निघालेली पुणे - परभणी ही एसटी बस ( क्रमांक एम एच २० जी सी ३४७९) रांजणगाव येथे आले असता त्या ठिकाणी एक महाविद्यालयीन तरुणी एसटी बसमध्ये बसली त्याचवेळी आधीच बसलेल्या एका तरुणाने



रांजणगाव ते कारेगाव दरम्यान या महाविद्यालयीन विद्यार्थीनीची छेडछाड करण्यास सुरुवात केली प्रवाशांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यानंतर बस थांबवून कारेगाव येथील पीएमटी बस स्थानक चौकातून ही बस थेट रांजणगाव पोलीस ठाण्यात नेण्यात आली आणि या तरुणाला एसटीतून खाली उतरून पोलीस ठाण्यात नेले व त्या ठिकाणी त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली अधिक तपास रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.

# निघोजला संत सावता माळी महाराज पुण्यतिथी उत्सव साजरा

## अरण ते निघोज पायी दिंडीचे स्वागत

निघोज : प्रतिनिधी

**संत सावता माळी महाराज पुण्यतिथी उत्सव निघोज येथे मोठ्या उत्साहात साजरा. यावेळी भुकन मळा परिसरातील संत सावता महाराज मंडळ पदाधिकारी व सदस्य यांनी निघोज पेठेतून संत सावता महाराज यांच्या प्रतिमेची मोठी मिरवणूक काढली होती सावतामाळी पुण्यतिथी निमीत्त अरण ते निघोज पायी ज्योतीचे निघोज मध्ये उत्साहात स्वागत करण्यात आले.**

संत सावतामाळी संजीवन समाधी आरती ज्योत गाव अरण ता. माढा जि . सोलापूर येथून भुकन मळ्यातील भक्तांनी ज्योत आणली .तिन दिवसा पूर्वी अरण गाव ते निघोज असा पायी प्रवास



करून तरुणांनी ज्योत निघोज गावात दाखल केली.सर्व निघोज ग्रामस्थांनी त्यांचे फुले उधळून जल्लोशात स्वागत केले . तसेच गावात मिठाई वाटप करण्यात आले.

सावतामाळी पुण्यतिथी निमित्त माळी समाजाच्या भक्तांनी सक्रीय भाग घेत भजन ,फुगड्या खेळत ,आतीष बाजीही करण्यात आली . ज्योत आणण्यासाठी तरूण कार्यकर्ते होते .ज्योती नेताना भैरवनाथ मित्र मंडळाने जेवन दिले विकास शिंदे अध्यक्ष होते . ज्योत आणण्यासाठी दत्तात्रय भुकन शरद भुकन सावता भुकन सार्थक भुकन कीरण भुकन विजय भुकन किरण भुकन स्वप्नील भुकन अंकुश भुकन प्रेम भुकन बाळू भुकन सागर अनंत भाऊ राऊत यशोदीप भुकन सार्थक राठोड . सार्थक भुकन प्रदूमन्य भुकन हर्षद भुकन प्रीतम भुकन निरज भुकन राजू भुकन खंडू भुकन संतोष भुकन अनिकेत भुकन ओम भुकन मोहीत भुकन गौरव भुकन व पत्रकार आनंद भुकन माजी उपसभापती खंडू भुकन उपस्थित होते .

# गोरेश्वर पतसंस्थेविरोधात निदर्शने आणि मोर्चा

## ठेवीदार, खातेदारांचा इशारा

गोरेगांव : प्रतिनिधी

**गोरेश्वर पतसंस्थेमध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवींचे तसेच बचत खात्यावरील पैसे मिळत नसल्याने संतप्त खातेदारांनी संस्थेविरोधात निदर्शने करून गावामध्ये मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.**



यासंदर्भात संस्थेच्या ११४ ठेवीदार तसेच खातेदारांनी मुख्यमंत्र्यांपासून पारनेर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर केले असून येत्या रविवारी, ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता गोरेगाव येथे गोरेश्वर पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. निदर्शनानंतर गावातून मोर्चा काढण्यात येऊन ठेवीदार तसेच खातेदारांच्या हक्काची जागृती करण्यात येऊन न्याय मिळविण्यासाठी आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

गोरेगाव मधील दोन्ही आंदोलनानंतर आंदोलन पारनेर येथे पारनेर पोलीस ठाण्यात जाउन दोषी व्यक्तिंवर, यंत्रणेवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीचे निवेदन सादर करणार आहेत. ठेवीदार तसेच खातेदारांनी दिलेल्या निवेदनात पतसंस्थेतील खातेदार-ठेवीदार यांच्या सेव्हींग्ज तसेच ठेवींवरील रकमा व्याजासह त्वरीत मिळाव्यात, पतसंस्थेतील गैरव्यवहारांची चौकशी करून तसेच जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर फसवणूकीसह फौजदारी गुन्हे दाखल करावेत, यापूर्वी सबंधितांनी दिलेल्या निवेदनांची चौकशी करून कारवाई करावी, पतसंस्थेतील सदस्यांचा कारभार पारदर्शी होण्यासाठी दरमहा लेखा-जोखा खातेदारांच्या माहीतीसाठी फलकांवर सादर करावा, सेव्हिंग्ज रकमा वाटप करण्याचे निश्चित धोरण जाहिर करावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात गोरेश्वर पतसंस्थेमध्ये ठेवी तसेच बचत खात्यावर रक्कम असलेल्या सर्व ठेवीदारांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून सर्व ठेवीदार तसेच खातेदार यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन मागे घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# अष्टविनायक महामार्गावरील बसथांब्यांची दुरावस्था !

## ■ स्वच्छतागृहात पाण्याअभावी अस्वच्छतेचे साम्राज्य ■ अष्टविनायक यात्रा करणाऱ्या भाविकांची कुचंबणा

शिरूर : सतीश डोंगरे

**अष्टविनायक महामार्गावर प्रवासी भाविकांच्या सेवेसाठी ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या आकर्षक अशा बस थांब्यांनी या महामार्गाची शोभा वाढविली खरी परंतु अवघ्या वर्षभरातच या बसथांब्यांची दुरावस्था झाली आहे. सुसज्ज आणि आटोपशीर व आकर्षक रचना केलेले अशा प्रकारचे ४० बसथांबे दुरुस्ती देखभालीअभावी अस्वच्छतेची आगार बनली आहेत.**




राज्यातील अष्टविनायक गावांना जोडणारा प्रमुख महामार्ग हा शिरूर तालुक्यातील अनेक गावांमधून गेला आहे.रांजणगांव वरून पुढे मोरगाव आणि सिध्दटेक या अष्टविनायक गावांना हा मार्ग जोडला गेला आहे. शिरूर तालुक्यातील कवठे, मलठण, सोनेसांगवी, रांजणगाव, बाभुळसर खुर्द, कर्डे, आंबळे, न्हावरा, निर्वी, पिंपळसुटी, शिरसगाव काटा, इनामगाव, तांदळी ते सिध्दटेक असा हा मार्ग शिरूर तालुक्यातून जात आहे. या अष्टविनायक मार्गाचे काम रांजणगाव-सोनेसांगवी व इनामगाव रस्त्याचा काही अपवाद वगळता जवळपास पूर्णतत्वाकडे गेले आहे.

वर्षभरापूर्वी या अष्टविनायक महामार्गावर भाविकांच्या सोईसाठी ४० बसथांबेही उभारण्यात आले होते. हे सर्व बसथाबे या महामार्गाची शोभा वाढवत दिमाखात आजही उभे आहेत. मात्र या सर्व बस थांब्यांची अवस्था सध्या अतिशय केविलवाणी झाली आहे. या छोट्याशा पण आकर्षक बसथांब्यावर त्या त्या स्थानिक गावांच्या नावांबरोबरच निसर्ग वाचवा... पाणी जपून वापरा... अशा प्रकारे सामाजिक प्रबोधन करणारे संदेश पोस्टरच्या माध्यमातून लावण्यात आले होते. काही बस थांब्यावर अष्टविनायकाची महती सांगणारे तसेच सद्गुरु श्री वामनराव पै यांची प्रार्थना आणि मंत्र, आणि अष्टविनायक मार्गावरील त्या त्या गावातील ग्रामदैवतांची सचित्र माहिती फ्लेक्सच्या माध्यमातून लावण्यात आली होती. त्यातून या बस थांब्यांचे सौंदर्य आणखी खुलून दिसत होते. परंतु आता हे सर्व फ्लेक्स फाटून त्याची लक्तरे हवेत फडफडत आहेत. ऊन आणि पावसाने संबंधित बस थांब्यावरील गावांच्या नावांचे रंगही उडाले आहेत. अनेक बसथांबे गाजर गवतांनी वेढले आहेत. काही बस थांब्यावर लावण्यात आलेल्या अष्टविनायक गणपतीची आणि ग्रामदैवतांची सचित्र माहिती सांगणाऱ्या फ्लेक्सची दुरवस्था झाल्याने भाविकांच्या भावना दुखावल्या जात आहेत. मात्र याचे कोणालाच सोयरसुतक नाही.

बस थांब्यात बसण्यासाठी आरामदायी आसन व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचीही मोडतोड झाली आहे. बहुतेक बसथांब्यावर स्त्री पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे ही उभारण्यात आली आहेत. मात्र या स्वच्छतागृहांमध्ये पाण्याची व्यवस्था नसल्याने स्वच्छतागृह अस्वच्छतेची आणि कचऱ्याची आगार बनली आहेत. या ठिकाणी थांबतांना अक्षरशः नाक मुठीत धरूनच थांबावे लागते अशी अवस्था आहे. लाखो रुपये खर्च करुन हे बस थांबे बनविण्यात आले तरीही भाविकांना ऊन- वारा, पावसाचा सामना करावा लागत आहे, त्यामुळे अष्टविनायकाची यात्रा करणाऱ्या भाविकांमध्ये नाराजीचा सूर आहे. काही प्रमुख गावात अष्टविनायक क्षेत्रे आणि त्यांचे अंतर दर्शविणाऱ्या लोखंडी भक्कम अशा स्वागत कमानी उभारण्यात आलेल्या आहेत. त्याचीही जड वाहतुक करणाऱ्या वाहनांमुळे मोडतोड झाली आहे.

अष्टविनायक यात्रेच्या निमित्ताने या रस्त्यावरून प्रवास करताना भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना कुठल्याही गैरसोयीचा सामना करावा लागू नये तसेच प्रवास त्यांना कंटाळवाणा वाटू नये यासाठी बांधकाम विभागाच्या वतीने या रस्त्यावर अजून ही काही सुधारणा, उपाययोजना करण्याची गरज आहे.

### अष्टविनायक मार्गाचे काम सुंदर पण देखभालीकडे दुर्लक्ष !

**कोट्यावधी रूपये खर्चून बनविण्यात आलेल्या अष्टविनायक महामार्गाचे काम खरोखरच अतिशय सुंदर झाले आहे. परंतू या रस्त्याचे काम जेवढे सुंदर झाले आहे तेवढेच त्याच्या देखभाल दुरुस्तीकडे लक्ष न दिल्याने या रस्त्याची अवस्था केविलवाणी झाली आहे. अनेक ठिकाणी गतिरोधकही नाहीत, त्यातून अपघातांच्या संख्येत वाढ होत आहे. बसथांब्यांची अवस्था बिकट आहे. रस्ता बनविताना अनेक त्रुटी राहिल्या आहेत. याबाबत आपण लवकरच नामदार दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन हा विषय त्यांच्या कानावर घालणार आहोत.**

**श्री. दशरथ फंड**
माजी सरपंच, बाभुळसर खुर्द

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com